३०, ५० आणि ६५ दिवसांनी ओलिताच्या तीन पाळ्या दिल्यास अधिक उत्पन्न मिळते. जेथे एकाच ओलिताची सोय आहे तेथे ५० दिवसांनी, दोन ओलिताची सोय असल्यास ३० ते ५० दिवसांनी ओलीत द्यावे. पीक हलक्या जमिनीत घेतल्यास ओलिताच्या ३ ते ५ पाळ्या द्याव्यात. खोल काळ्या जमिनीत अधिक उत्पादन व आर्थिक नफा आणि जास्त पाणी वापर कार्यक्षमता मिळण्याकरिता करडीला पहिले ओलीत वाढीचा अवस्थेत (पेरणी नंतर ३० व्या दिवशी) आणि दुसरे ओलीत दाणे भरण्याच्या अवस्थेत (पेरणीनंतर ८० व्या दिवशी) द्यावे. ओलीत करतांना पिकात जास्त वेळ पाणी साचून राहणार नाही याची काजी घ्यावी? करडीला ओलीत करण्याकरीता विविष्ट पध्दत वापरावी. दोन तासाच्या आड दांड काढून दांडानी फक्त पाणी शेवटपर्यंत घेवून जावे. झाडांना पाण्याचा स्पर्श होण्याची किंवा झाडांच्या अगदी बुडाशी पाणी देण्याची गरज नाही.

कापणी व मळणी :

पिकाची पाने आणि बोंड्य पिवळ्या पडल्यानंतर पिकाची कापणी करावी. त्यानंतर झाडांचे लहान लहान ढिग करून शेतातच वाळण्यासाठी ठेवावे. ढिगातील झाड चांगले वाळल्यानंतर काठीने बडडून किंवा थ्रेशरचे सहाय्याने मळणीकरून बी अलग करावे. अलीकडे कंबाईन हारवेस्टरमुळे काढणी सुकर झाली आहे. त्याचा उपोग करावा. नंतर बी स्वच्छ करून, वाळवून साठवावे.

उत्पादन : मध्यम जमिनीत हेक्टरी १० ते १२ क्विंटल आणि भारी जमिनीत १४ ते १६ क्विंटल उत्पादन मिळते. ओलीत केल्यास २० ते २५ क्विंटल एवढे उत्पादन मिळू शकते.

किडी, रोग व त्यांचे व्यवस्थापन :

मावा : इतर पिकांवरील माव्यापेक्षा आकाराने मोठा, रंगानू काळा, मृदू, अर्ध गोलाकार असून शरीरावर पाठीमागचे बाजूस दोन शिंगे असतात. मावा हा झाडाची पाने, फांद्या व बोंडातून रस शोषण करतो. जास्त प्रादुर्भाव झाल्या झाड वाळते. रस शोषणाशिवाय मावा आपल्या शरीरातून साखरेसारखा चिकट पदार्थ झाडावर टाकतो. त्यावर काळी बुरशी वाढल्यामुळे झाडाचे अन्न तयार करण्याच्या प्रक्रियेत बाधा येते. मावा किडीचा प्रादुर्भाव सप्टेंबरच्या शेवटच्या ते ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पेरलेल्या पिकावर कमी राहून उत्पन्न चांगले मिळते. कोरडवाहू क्षेत्राकरीता माव्या सारख्या रस शोषणाच्या किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पेरणी सप्टेंबरच्या चवथ्या आठवड्यामध्ये करावी. करडीच्या ३० टक्के झाडांवर माव्याच्या समूहाचा प्रादुर्भाव किंवा प्रत्येक झाडावर १५ ते २० मावा किटक ही आर्थिक नुकसानीची मर्यादा पातळी आढळल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही ६६० मि.ली. हेक्टरी ५००-१००० लिटर पाण्यात मिसळून (१३ मि.ली./१० लि. पाणी) फवारणी करावी. (लेबल क्लेमनुसार) किंवा फेन्थेएट २ टक्के डि.पी. २० किलो किंवा क्विंनॉलफॉस १.५ टक्के डि.पी. २० किलो प्रति हेक्टरी ५०० ते १००० लिटर पाण्यातून फवारणी करावी. (४० ग्रॅम/१० लिटर पाणी) किंवा ॲसिफेट ७५ टक्के एस.पी. ७८० ग्रॅम ५००-१००० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

अल्टरनेरियाचे ठिपके : या रोगाचा प्रसार हवा, जमीन तसेच दुषित बियाण्याव्दारे होतो. रोगाची तीव्रता जास्त असल्यास पानाची गळ होऊन उत्पन्नात घट येते.

मर रोग : रोगाचा प्रसार बियाणे आणि दूषित जमिनीव्दारे होतो. या रोगाचे प्रमाण जास्त असल्यास खालची पाने वाळून झाड कोलमडून मरते व उत्पन्नात घट येते. या रोगाच्या नियंत्रणाकरीता ट्रायकोडर्मा ४ ग्रॅ. प्रति किलो बियाणे या प्रमाणात घेऊन बियाण्याच्या सर्व बाजूने चांगला थर बसेल अशाप्रकारे चोळावे, तसेच पिकाची फेरपालट करावी. रोगट झाडाचे अवशेष जाळून किंवा जमिनीत गाडून नष्ट करावेत.

टिप : अनेक रसायनाचे एकत्र मिश्रण करून फवारणी करणे टाळावे व सुरक्षित फवारणी तंत्राचा अंगीकार करावा.

घडी पत्रिका क्र. : डॉ. पंदेकृवि/प्रका/१५९७/२०२५

करडी लागवड तंत्रज्ञान



डॉ. किशोर कि. झाडे
वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रमुख

डॉ. प्रितम एन. चिरडे
विषय विशेषज्ञ
(कृषिविद्या)

श्री. नरेश पी. बुध्देवार
विषय विशेषज्ञ
कृषि हवामानशास्त्र)

श्री. पुष्पक ए. बोथीकर
विषय विशेषज्ञ (पिक संरक्षण)

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषि विज्ञान केंद्र
सोनापूर-गडचिरोली

दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३०१७
Email - kvksonapur@gmail.com
Website - www.kvkgadchiroli.in

करडी हे रबी हंगामातील अल्प खर्चिक व महत्वाचे तेलबिया पीक आहे. अवकर्षणावर मात करण्याची क्षमता या पिकात आधिक्याने असल्यामुळे इतर रबी पिकांपेक्षा कोरडवाहू क्षेत्राकरिता हे पीक एक वरदान आहे. पण ओलीताखाली सुध्दा करडी चांगली येते. म्हणून ओलिताच्या करडीचे क्षेत्र वाढविणे गरजेचे आहे. फक्त तीन ओलीत दिल्यास उत्पादन दुप्पट होते.

हवामान :

या पिकाला थंड हवामान मानवते. पीक वाढीच्या कोणत्याही अवस्थेत जास्त पाऊस आणि पाणी साचून राहणे या पिकास मानवत नाही. त्याच प्रमाणे अती उष्णतापमानाचा आणि अति थंडीचा या पिकावर विपरीत परिणाम होतो.

जमीन :

या पिकास मध्यम ते खोल, ओल टिकवून ठेवणारी, परंतु चांगला निचरा असणारी जमीन निवडावी. क्षारयुक्त जमिनीत सुध्दा हे पीक घेता येते.

पूर्वमशागत :

करडीचे एकच पीक घ्यावयाचे ठरविल्यास उन्हाळ्यात एक वेळ नांगरणी, वखरणीच्या २-३ पाळ्या देऊन, काडीकचरा वेचून जमीन चांगली भुसभुशीत करावी. पावसाळ्यात दर पंधरा दिवसांनी वखरणी करून पाणी जिरवून तण नियंत्रण करावे. दूबार पीक घ्याचे असल्यास खरीप पिकाचे काढणीनंतर कमीत कमी मशागतीने जमीन परेणीस तयार करावी, जेणेकरून जमिनीत ओलावा टिकून राहील. म्हणजेच उगवण चांगली होऊन रोपसंख्या पुरशी मिळेल.

भरखते :

पूर्वमशागत करतांना शेणखत/कंपोस्ट खत हेक्टरी ५ टन शेवटचे वखरणी अगोदर जमिनीत मिसळावे.

बियाणे :

भारी जमिनीसाठी हेक्टरी १० किलो, तर मध्यम जमिनीसाठी हेक्टरी १२-१५ किलो बियाणे वापरावे. संकरीत वाणाचे ७.५ किलो बियाणे वापरावे.

बीज प्रक्रिया :

पेरणीपूर्वी बियाण्यास ॲझोटोबॅक्टर अधिक पीएसबी जिवाणू संवर्धनाची बीज प्रक्रिया (प्रत्येकी २०० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास) करावी. मर प्रवण भागात मर रोगाच्या प्रतिबंधासाठी ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशकाची ४ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणे बीज प्रक्रिया करावी किंवा शेणखतापासून जमिनीत मिसळावे.

शिफारशीत वाण / जाती

वाण	फुलोऱ्यावर येण्याचा कालावधी (दिवस)	परिपक्व येण्याचा कालावधी (दिवस)	१०० दाण्याचे वजन (ग्रॅम)	दाण्याचा रंग	तेलाचे प्रमाण (%)	हेक्टरी उत्पादन (क्विं.)
सुधारीत वाण						
एकेएस २०७	७०-७५	१२५-१३०	६.५	पांढरा	३०	१४-२०
भीमा	७५-८०	१३०-१३५	६.०	पांढरा	३०	१२-२०
नारी-६ (बिनकाटेरी)	८०-८५	१३५-१३७	४.३	पांढरा	३१	१०-१५
पिकेव्ही पींक (एकेएस३११)	७५-८०	१३०-१३५	३.८	पांढरा	३२	१५-२१
संकरीत वाण						
नारी-एनएच १ (बिनकाटेरी)	७५-७९	१३५-१४०	४.३	पांढरा	३१	१५-१८

पेरणीची वेळ :

करडीची पेरणी सप्टेंबरच्या चवथ्या ते ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात केल्यास मावा किडीचा प्रादुर्भाव कमी राहतो व उत्पादन चांगले मिळते. ओलीताखालील करडीची पेरणी ऑक्टोबर शेवटपर्यंत करण्यास हरकत नाही. उशिरात उशीरा नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात पेरणी करावी. बियाणे रात्रभर पाण्यात भिजवून पेरणी केल्यास उगवण लवकर व चांगली होते.

पेरणीची पदत :

पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी म्हणजे बियाणे व खते एकाचवेळी देता येतील. पेरणी करतांना दोन ओळीतील अंतर ४५ सें.मी. ठेवावे.

आंतरपिके :

करडी पिक सलग न घेता हरभरा, जवस आंतरपीक पध्दतीमध्ये करडी + हरभरा ६:३ ओळी किंवा करडी + जवस ३:३ ओळी या प्रमाणात घ्यावे.

रासायनिक खत मात्रा, वेळ :

हे पीक रासायनिक खतास उत्तम प्रतिसाद देते. कोरडवाहू करडी पिकास पेरणीसोबत ४० किलो नत्र (१९४ किलो अमोनियम सल्फेट किंवा ८७ किलो युरिया) व २५ किलो स्फुरद (१५६ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) प्रति हेक्टर द्यावे.

विरळणी :

पिकाची विरळणी उगवणीनंतर १०-१२ दिवसांनी करून दोन रोपात २० ते ३० सें.मी. अंतर राखावे. हेक्टरी झाडांची संख्या ७५,००० ते १ लाख पर्यंत ठेवावी.

आंतरमशागत :

आवश्यकतेनुसार १-२ वेळा निंदणी व डवरणी करून जमीन तणविरहीत व भुसभुशीत केल्याने ओलावा टिकून राहण्यास मदत होते.

तण व्यवस्थापन :

जेथे मजुरांची चणचण आहे तेथे ओलिताखालील करडीमध्ये तणनाशकाची गरज भासल्यास वार करावा. त्यासाठी पेरणीपूर्वी फ्लुक्लोरॅलीन १ किलो क्रियाशील घटक (२ लिटर बासालीन) प्रति हेक्टरी ६०० ते ७०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

ओलीत व्यवस्थापन :

जेथे ओलीताची सोय आहे तेथे या पिकास पेरणीनंतर